e/ [illegible]

# माहिती तंत्रज्ञान संचालनालय

माहिती तंत्रज्ञान संचालनालयासाठी शासकीय / निमशासकीय सेवेतून गट अ (कमीत-कमी अवर सचिव) संवर्गातून सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी तसेच गट ब (कमीत-कमी कक्ष अधिकारी) संवर्गातून सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी यांच्या सेवा करार पध्दतीने मानधन तत्वावर विवक्षित कामासाठी नामिकासूची करण्याकरीता अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | संवर्ग | विवक्षित कामाचे स्वरुप | भरावयाचे पद | वय अर्हता व अनुभव |
|---|---|---|---|---|
| १. | गट-अ (कमीत-कमी अवर सचिव) | "माहिती तंत्रज्ञान संचालनालयाच्या कार्यालयातील आस्थापनाविषयक, प्रशासकीय बाबी तसेच दैंनदिन बाबी इत्यादी कामकाज. | १ | गट-अ (कमीत-कमी अवर सचिव) पदावरील कामकाजाचा किमान ३ वर्षांचा अनुभव. संगणकाचे ज्ञान, तसेच प्रशासकीय बाबी आणि सेवाविषयक कामकाजाचा अनुभव असलेल्यांना प्राधान्य वयोमर्यादा - ५८ ते ६५ वर्षे. |
| २. | गट-ब (कमीत-कमी कक्ष अधिकारी) | "माहिती तंत्रज्ञान संचालनालयाच्या कार्यालयातील आस्थापनाविषयक, प्रशासकीय बाबी तसेच दैंनदिन बाबी इत्यादी कामकाज. | १ | गट-ब (कमीत-कमी कक्ष अधिकारी) पदावरील कामकाजाचा किमान ३ वर्षांचा अनुभव. संगणकाचे ज्ञान, तसेच प्रशासकीय बाबी व तांत्रिक कामकाजाचा अनुभव असलेल्यांना प्राधान्य वयोमर्यादा - ५८ ते ६५ वर्षे. |

नियुक्तीच्या अटी व शर्ती -

१. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क. सीबीई-१५२५/प्र.क्र.३७/आस्थामं (का.१३) दिनांक १०-०६-२०२५ अन्वये नियुक्तीच्या अटी व शर्ती विनयमित करण्यात येतील.
२. करारपध्दतीने संचालनालयामध्ये नियुक्त केलेल्या व्यक्तींला कोणतेही पदनाम असणार नाही.
३. करार तत्वावरील नियुक्त व्यक्तीस अर्जित, नैमित्तिक व वैद्यकीय रजा अनुज्ञेय असणार नाहीत.
४. नियुक्तीच्या कालावधीत विवक्षित काम पूर्ण करण्याची जबाबदारी करारपध्दतीने नियुक्ती देण्यात आलेल्या व्यक्तीची असेल.

५. करारपध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींना कोणत्याही प्रकारचे प्रशासकीय / वित्तीय अधिकार नसतील. अशी व्यक्ती कोणत्याही शासकीय पत्र / आदेश यावर स्वाक्षरी करण्यास पात्र असणार नाही.

६. इच्छूक सेवानिवृत्त अधिकारी यांनी त्यांचे अर्ज आवश्यक त्या शैक्षणिक अर्हता व अनुभवाच्या प्रमाणपत्रासह हि जाहिरात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून दि. २९-०८-२०२५ पर्यंत assttech२.it@maharashtra.gov.in या ई-मेल आयडीवर सादर करावेत.

(कान्हुराज बगाटे, भाप्रसे)
संचालक, माहिती तंत्रज्ञान संचालनालय